PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhaubeej
Year: 1955

Song: Soniyachya Tati Ujalalya Jyoti
Lyricist: Kavi Sanjeev

सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती
सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती
ओवाळीते भाऊराया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया

सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती
ओवाळीते भाऊराया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया

माया माहेराची पृथ्वी मोलाची
माया माहेराची पृथ्वी मोलाची
साथ याला बाई चंद्र सूर्याची
कृष्ण द्रोपदीला जसा रे भेटला
पाठीशी राहू दे छाया रे
तशी पाठीशी राहू दे छाया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया

चांदीचे ताट चंदनाचा पाट
चांदीचे ताट चंदनाचा पाट
सुगंधी गंध दरवळे
रांगोळीचा थाट

भात केसराचा घास अमृताचा
जेवू घालीते भाऊराया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया

नऊ लाख दिवे हे
निळया आभाळी
नऊ लाख दिवे हे
निळया आभाळी
वसुंधर अशी चंद्रा ओवाळी
नक्षत्राचा सर येई भूमीवर
पदरी पदर भेट घ्याया
चंद्र वसुंधेला सख्या रे भेटला
पाठीशी राहू दे छाया रे
तशी पाठीशी राहू दे छाया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया

सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती
ओवाळीते भाऊराया रे
वेडया बहिणीची रे वेडी माया
वेडया बहिणीची रे वेडी माया
वेडया बहिणीची रे वेडी माया

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*